राज्य शासन पुरस्कृत "महाजल" व
केंद्र शासन पुरस्कृत "**स्वजलधारा**"
योजनांना तांत्रिक व प्रशासकीय
मंजूरी देण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक, क्रमांक ग्रापापु-१००५/प्र.क्र.८५/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक: ९ मे २००५**

वाचा: (१)शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
क्र.ग्रापापु १००४/प्र.क्र.२४४/पापु-७, दिनांक १८ जानेवारी, २००५
(२) शासन शुध्दिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
क्र.ग्रापापु १००४/प्र.क्र.२४४/पापु-०७, दिनांक ८ फेब्रुवारी, २००५
(३) शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
क्र.ग्रापापु १००५/प्र.क्र.१३/पापु-०७, दिनांक १८ फेब्रुवारी, २००५
(४) शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
क्र.ग्रापापु १००५/प्र.क्र.७४(२)/पापु-०७, दिनांक २ मे, २००५

शासन परिपत्रक

राज्य शासन पुरस्कृत "**महाजल**" व केंद्र शासन पुरस्कृत "**स्वजलधारा**" योजनांच्या अंमलबजावणी बाबतच्या मार्गदर्शक सूचना संदर्भीय दिनांक २ मे, २००५ च्या परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. या मार्गदर्शक सूचनांमध्ये "**महाजल**" व "**स्वजलधारा**" योजने अंतर्गत योजनांना प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी देण्याबाबत सूचना दिलेल्या नसल्याने या परिपत्रकान्वये पुढीलप्रमाणे सूचना सर्व संबंधितांना देण्यात येत आहेत:-

(१) "**स्वजलधारा**" अथवा "**महाजल**" योजनेअंतर्गत स्वतंत्र ग्रामपंचायतीच्या पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकार संबंधित गावच्या "**ग्रामसभेस**" देण्यात येत आहेत. तसेच, एकापेक्षा जास्त ग्रामपंचायतींसाठीच्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेला प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकार संबंधित जिल्हा परिषदेस देण्यात येत आहेत.

(२) अशा प्रकारे **स्वतंत्र** गावाच्या योजनेस ग्रामसभेने व **प्रादेशिक** योजनेस जिल्हा परिषदेने प्रशासकीय मंजूरी दिल्यावर **रूपये ५ कोटी रकमे पर्यंतच्या** मांडवली खर्चाच्या योजनेची (स्वतंत्र गावच्या व प्रादेशिक योजनांची) तपासणी जिल्हा परिषदांनी संदर्भिय दिनांक २ मे, २००५ च्या शासन परिपत्रकात नमूद केलेल्या सर्व निकषांच्या आधारे

करावी व त्यास **सहमती** द्यावी, तर, रुपये ५ कोटीपेक्षा अधिक भांडवली किंमतीच्या योजनांची तपासणी संबंधित मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी शासनातर्फे करून प्रस्ताव शासनाकडे सहमतीसाठी सादर करावा.

(३) अशा प्रकारे शासनास सादर केलेल्या रुपये ५ कोटीपेक्षा अधिक भांडवली खर्च किंमतीच्या पाणी पुरवठा योजनेची योग्य तपासणी केली आहे किंवा नाही हे पाहून योजनेस शासन स्तरावरुन सहमती देण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत प्रादेशिक योजनेला राज्यस्तरावरुन अथवा स्वतंत्र गावच्या (ग्रामपंचायतीच्या) योजनेस जिल्हा परिषद स्तरावरुन **प्रशासकीय मान्यता देण्यात येवू नये.** फक्त शासनाचा सहभाग मंजूर करण्यापूर्वी **योजनेची तांत्रिक व अन्य तपासणी** करुन ती योग्य असल्यास उपलब्ध निधीनुसार शासन सहभाग मंजूर करावा. प्रशासकीय मान्यता संबंधित ग्रामपंचायत अथवा जिल्हा परिषदेनेच द्यावयाची आहे.

(४) योजनांचा प्राधान्य क्रम, मग त्या स्वतंत्र गावाच्या असो की एक पेक्षा अनेक गावांच्या प्रादेशिक असोत, शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक ग्रापापु१००४/प्र.क्र.२४४/ पापु-०७, दिनांक १८.१.२००५ व शासन शुध्दिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक ग्रापापु- १००४/प्र.क्र.२४४/पापु-०७, दिनांक ८ फेब्रुवारी २००५ मधील निकषानुसार ठरण्यात यावा व शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक ग्रापापु-१००५/प्र.क्र.१३/पापु-०७, दिनांक १८ फेब्रुवारी २००५ मधील सुचना नुसार निधी वितरणास जिल्हा परिषद/शासन स्तरावरुन मान्यता देण्यात यावी.

(५) स्वतंत्र गावच्या पाणी पुरवठा योजनेचे प्रारुप व आराखडे (Plan & Estimates) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, तंत्र विज्ञान संस्था अथवा सक्षम खाजगी सल्लागारांकडून करुन घेण्यास गावास मुभा आहे. तसेच जिल्हा परिषदेलाही त्यांचेकडे सक्षम यंत्रणा उपलब्ध नसल्यास योजनेचे प्रारुप व आराखडे बाहेरून करुन घेता येतील. यासाठी सुरुवातीला संबंधित ग्रामपंचायतीस मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे **कलम १३२ ब** नुसार उपलब्ध ग्राम पाणी पुरवठा निधीतून अथवा जिल्हा परिषदेस, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१च्या **कलम १३१** नुसार गठीत जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून खर्च करता येईल. अथवा इतर स्व:निधीतून खर्च करता येईल.

(६) योजना मंजूर झाल्यावर मंजूर प्राकलनाच्या कमाल २% खर्चाच्या ९०% (आदिवासी भागासाठी ९५%) निधीची प्रतिपूर्ती प्रारूप व आराखडे तयार करण्यासाठी व तांत्रिक मंजूरी घेण्यासाठी लागलेल्या प्रत्यक्ष खर्चापोटी केली जाईल. या २% रकमेतच तांत्रिक तपासणी शुल्काचाही समावेश राहील. योजना मान्य न झाल्यास हा खर्च संबंधित ग्रामपंचायत अथवा जिल्हा परिषदेला सोसावा लागेल. त्यामुळे गरजेनुसार व निधी उपलब्धतेची पडताळणी करुनच आणि संदर्भिय दिनांक १८.१.२००५ व दिनांक ८.२.२००५ च्या शासन आदेश नुसार प्राधान्यक्रमात आपली योजना बसू शकेल याची काळजी घेऊनच किमान खर्चाची योजना सादर करावी.

(७) रूपये ७५ लाखापर्यंतच्या भांडवली किंमतीच्या योजनेची तांत्रिक तपासणी करण्याचे प्राधिकार जिल्हा परिषदेच्या/महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यकारी अभियंता यांना देण्यात येत आहेत, तर, रूपये ७५ लाखावरील किंमतीच्या योजनांच्या तांत्रिक तपासणीचे प्राधिकार संबंधित अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना देण्यात येत आहेत, ही मान्यता सुध्दा ग्रामपंचायतीने अथवा जिल्हा परिषदेने स्वतःचे स्तरावर संबंधित यंत्रणेशी संपर्क साधून स्वतंत्ररीत्या घ्यावी. योजनेची तांत्रिक तपासणी करून घेण्यासाठी भांडवली खर्चाच्या १/२% (अर्धा टक्का) पर्यंत रक्कम खर्च करण्यास मुभा देण्यात येत आहे.

(८) वरीलप्रमाणे संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांकडून तांत्रिक तपासणी करून घेऊन व ग्रामपंचायत / जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय मान्यतेचा ठराव, शासन सहभाग प्राप्त होण्यासाठी सादर करावयाच्या प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

(९) योजनेची प्राकलने व आराखडे प्रत्यक्ष खर्चावर असावीत. त्यात वर नमूद केल्याप्रमाणे कमाल २% पर्यंत प्राकलन आराखडे खर्च, कमाल ५% पर्यंत तांत्रिक सल्लागार शुल्क व कमाल २% इतर प्रशासकीय खर्च अंतर्भूत करता येईल. यात तांत्रिक तपासणीचाही खर्च अंतर्भूत राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने

(सुधीर ठाकरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन



D:\BACKUP WS07\year 2005\CR 85 GR 11.5.05.doc